# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.10.2024** **वारःशनिवार**

---

1. बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाहीत - सर्वोच्च न्यायालयाचं स्पष्टीकरण
2. मतदार याद्यांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करत श्वेतपत्रिका काढण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी
3. 70वा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव येत्या 18 ते 22 डिसेंबरदरम्यान पुण्यात रंगणार
4. पुण्यातल्या शारदा ज्ञानपीठमचे संस्थापक आणि ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक पंडित वसंतराव गाडगीळ यांचं निधन आणि
5. न्यूझिलंडविरुद्धच्या बंगळुरू क्रिकेट कसोटीत दुसऱ्या डावात भारताची संयमी खेळी

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

बालविवाह प्रतिबंधक कायद्याला व्यक्ती विषयक वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणले जाऊ शकत नाही असं सर्वोच्च न्यायालयानं काल स्पष्ट केलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पिठानं देशात बाल विवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचनाही दिल्या. बालविवाह रोखण्याच्या उद्देशानं या कायद्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या अधिकारांच्या संरक्षणालाच प्राधान्य असून, वैयक्तिक कायदे या अंमलबजावणीत अडथळे म्हणून आणता येणार नाहीत, असं सरन्यायाधीश यावेळी म्हणाले. त्याचवेळी बालविवाह प्रतिबंधक कायद्यात काही त्रुटी असल्याचंही पीठानं नमूद केलं.

**<u>नड्डा-मुंबई</u>**

राष्ट्रसेवा करण्यासाठी संतांचा आशीर्वाद हवा; असं सांगून नकारात्मक शक्तींपासून राष्ट्राची सुरक्षा होण्याची गरज संतांनी काल व्यक्त केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी काल मुंबईत विविध धार्मिक संस्थांच्या विश्वस्तांशी संवाद साधला. विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>महाविकास आघाडी-मुंबई</u>**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुरू असलेल्या गैरप्रकारांची दखल निवडणूक आयोगानं घ्यावी आणि मतदार याद्यांमधल्या अनियमिततेबद्दल श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली आहे. आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी काल मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि त्यांना यासंदर्भात निवेदन दिलं. तसंच विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते

अंबादास दानवे यांनी निवडणूक आयोगालाही या संदर्भात पत्र लिहिलं आहे. पराभवाची भीती वाटत असल्यानं महाविकास आघाडीच्या समर्थकांची नावं मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी अर्ज क्रमांक 7 आणि 8 मध्ये फेरफार केल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं भाजपावर केला आहे.

**<u>तक्रार-मुंबई</u>**

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊन आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने आपल्या शासकीय संकेतस्थळावर एका दिवसात 259 शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसंच 27 महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या. यामुळे आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. आचारसंहिता भंग करणाऱ्या या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असं पत्र दानवे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलं आहे.

**<u>बावनकुळे</u>**

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल पुण्यात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची भेट घेतली. निवडणुकीसाठी इच्छुकांचा विचार पक्षानं ऐकून घेतला असून त्यांचं म्हणणं पक्ष श्रेष्ठींपुढे मांडण्यात येईल; पण पक्षाकडून ज्याला उमेदवारी मिळेल त्याचं काम करावं लागेल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>राजीनामा</u>**

पुणे शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांचा राजीनामा स्वीकारणार नसल्याचं पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी काल स्पष्ट केलं. राज्यपाल नियुक्त आमदारांच्या यादीत समावेश न झाल्यानं पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी पदाचा राजीनामा देण्याचा इशारा दिला होता; तर शहरातील 600 पेक्षा जास्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला होता. नाराजीची दखल घेतली असून योग्य वेळी न्याय दिला जाईल अशा शब्दात पवार यांनी पदाधिकाऱ्यांची समजूत घातली.

**<u>पर्यटन-अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात भंडारदऱ्याच्या कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात सध्या फुलांचा उत्सव सुरू झाला आहे. त्याबाबतचा एक वृत्तांत....

**अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसराला निसर्गाचं वरदान लाभलं आहे. इथला पाऊस अनुभवण्यासाठी राज्याच्या विविध भागातून आणि परराज्यातूनही पर्यटक मोठ्या प्रमाणावर भंडारदऱ्याला भेट देत असतात. वर्षा ऋतूमध्ये कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात कोसळणारे अनेक लहान मोठे धबधबे पर्यटकांचं प्रमुख आकर्षण असतं. आता पावसाळा संपल्यानंतर इथं फुलांचा उत्सव सुरू झाला आहे. हिरवे डोंगर आणि त्यावर अनेकविध रंगांची सुंदर फुलं आता पर्यटकांना आकर्षून घेत आहेत. सोनकीच्या फुलांनी संपूर्ण रतनगड पिवळसर झाला आहे; त्यातच घोडेधारीजवळ कारवी फुलल्याने निसर्ग अधिकच खुलून दिसत आहे. अलंगगडालाही कारवीच्या फुलांनी वेढा टाकला आहे. सोनकी, सोनका, रानतेरडा, पंधाडा,**

**पिपडा, कुर्डू, शिळंद, गाजरी अशा रानफुलांचा हा रंगोत्सव पाहण्यासाठी पर्यटकांची पावलं भंडारदरा भागाकडे वळत आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज सातपुते अहिल्यानगर**

**सवाई गंधर्व**

जगभरातल्या शास्त्रीय संगीत रसिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. यंदा 70व्या वर्षात पदार्पण करणारा 5 दिवसांचा हा संगीत महोत्सव पुण्यात मुकुंद नगर मधल्या महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडा संकुलात येत्या 18 ते 22 डिसेंबर दरम्यान होणार आहे. आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी एका पत्रकाद्वारे ही माहिती कळवली आहे.

**फुले विद्यापीठ**

भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघाचा अर्थात फिक्कीचा या वर्षाचा सर्वोकृष्ट विद्यापीठ हा पुरस्कार राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मिळाला आहे. केंद्र सरकारच्या ब्रिटीश उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचं कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील 10 जिल्ह्यात विस्तारलेलं आहे. कृषि विद्यापीठानं आत्तापर्यंत अन्नधान्य, फळं, फुलं, चारा, पिकं याची 306 हुन अधिक वाण विकसीत केली असून मृदा आणि जलसंधारण, पीक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, हरितगृहातील शेती, प्रक्रीया, दुग्धशास्त्र या विषयी सखोल संशोधन केलं आहे. हा पुरस्कार मिळवणारं महाराष्ट्रातील हे एकमेव विद्यापीठ आहे.

**गोंडवाना**

गोंडवाना विद्यापीठालाही 'फिक्की'चा 'संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व' हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या वतीनं एकल ग्रामसभा प्रशिक्षण समन्वयक डॉ. नरेश मडावी आणि डॉ. मनीष उत्तरवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गोंडवाना विद्यापीठानं ग्रामसभा सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोंडवाना विद्यापीठ राबवत असलेल्या 'गाव तिथे विद्यापीठ', 'सीआयआयआयटी', 'एसटीआरसी', या नावीन्यपूर्ण आणि अन्य सामाजिक उपक्रमांचीही 'फिक्की'नं दखल घेतली.

**जादा गाड्या**

दिवाळीनिमित्त पुणे विभागाच्या एस.टी. महामंडळातर्फे अतिरिक्त गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. 27 ते 31 ऑक्टोबर पर्यंत शिवाजीनगर, स्वारगेट, पिंपरी चिंचवड बसस्थानकापासून, या गाड्या सोडण्यात येणार आहेत. राज्याच्या विविध भागात जाण्यासाठी 504 जादा गाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे.

**निधन**

पुण्यातल्या शारदा ज्ञानपीठमचे संस्थापक आणि ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक पंडित वसंतराव गाडगीळ यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते. काल सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पंडित वसंतराव गाडगीळ यांचं व्यक्तिमत्व संस्कृत भाषेच्या प्रचार प्रसारासाठी समर्पित होतं. प्राचीन संस्कृत ग्रंथ, वेद उपनिषदे यांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात

संस्कृत अध्यापन, शारदा ज्ञानपीठाची स्थापना, शारदा संस्कृत मासिक, असं विविधांगी कार्य त्यांनी केलं. ते संस्कृत भाषेत संभाषण करत असत; संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी त्यांनी देशा-परदेशात अनेक व्याख्यानंही दिली.

**<u>क्रिकेट</u>**

न्यूझीलंडविरुद्धच्या बंगळुरू क्रिकेट कसोटीच्या कालच्या तिसऱ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात 3 बाद 231 धावा केल्या. न्यूझीलंडकडे सध्या 125 धावांची आघाडी आहे. भारताकडून विराट कोहली आणि सरफराज खान यांनी प्रत्येकी 70 धावा तर रोहित शर्माने 52 धावा करत भारताचा डाव सावरला. तत्पूर्वी न्यूझीलंडने पहिल्या डावात 402 धावा करून मोठी आघाडी घेतली होती.

**<u>पाऊस</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेले तीन-चार दिवस मेघगर्जनेसह पाऊस सुरू आहे. पावसाच्या या संततधारे मुळे कापणी योग्य पिकांचं नुकसान झालं असून सुमारे 50 हजार हेक्टर वरचं पिक धोक्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.